# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २७/०६/२०२५ (शुक्रवार)**

---

## नागपुर ग्रामीण पोलीसांनी सन २०२४ च्या तुलनेत सन २०२५ मध्ये एन.डी.पी.एस कायदयाअंतर्गत केलेली अतुलनीय कामगिरी, जुन २०२५ पर्यंत एन.डी.पी.एस कायदयाअंतर्गत ३४० गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अंमली पदार्थांची तस्करी आणि वाढत्या सेवनाला आळा बसण्यासाठी संपूर्ण नागपूर ग्रामीण जिल्हयात मा. श्री हर्ष ए. पोद्दार पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कारवाई करण्यासाठी वेळोवेळी विशेष मोहीम राबविल्या गेल्या. विशेष मोहिमे अंतर्गत जिल्हास्तरावर स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण येथील अधिकारी आणि अंमलदार यांचे स्वतंत्र विशेष पथक **(एन.डी.पी.एस. सेल)** स्थापन करण्यात आले. तसेच नागपुर ग्रामीण जिहयातील सर्व प्रभारी यांना कडक कारवाई बाबत आदेशीत करण्यात आले. त्यांच्या पोलीस स्टेशन स्तरावर त्यांच्या हद्दीतील अंमली पदार्थाचा साठा, विक्री, वाहतुक करणारे आरोपीतांवर तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांवर कडक कारवाई करण्याकामी पोलीस स्टेशनला **(एन.डी.पी.एस. सेल)** स्थापन करण्यात आले. याचा परीणाम म्हणुन सन २०२४ च्या तुलनेत सन २०२५ मध्ये अंमली पदार्थाचा साठा, विक्री ,वाहतुक आणि सेवन करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हे नोंद करून नागपुर ग्रामीण पोलीसांनी अतुलनीय कामगिरी केली आहे.

**एन.डी.पी.एस कायदया अंतर्गत सन २०२४ मध्ये ५२ गुन्हे दाखल असुन सन २०२५ मध्ये (आज पावेतो) ३४० गुन्हे दाखल आहे. सन २०२४ मध्ये आणि सन २०२५ (आज पावेतो) मध्ये संपुर्ण गुन्हे उघड आहे. तसेच पोलीसांनी एन.डी.पी.एस कायदयान्वये दाखल होणाऱ्या प्रत्येक प्रकरणात सखोल तपास करून अंमलीपदार्थ पुरवठा करणारे आणि विकणारे यांची साखळी जळवुन त्यांचा शोध घेतला आणि पुरवठा करणारे स्त्रोत शोधुन शेवटया साखळी पर्यत जावुन ओरीसा येथुन ४ आरोपीतांना अटक करण्यात आली तसेच मुंबई येथुन २ आरोपीतांना अटक केली आहे. नागपुर ग्रामीण जिल्हयात**

**सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांवर सतत कारवाई करण्यात येत आहे.**

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण,जिल्हा आणि नागपुर ग्रामीण पोलीस दलातर्फे सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कुणालाही अवैध अंमली पदार्थाचा साठा, विक्री, वाहतुक आणि सेवन करणाऱ्यांबाबत माहीती प्राप्त होताच पोलीसांना तात्काळ माहीती दयावी.**

## अवैधरित्या देशीदारू, मोहाफुल दारू बाळगणा—या/विक्री करणाऱ्या आरोपीतांवर,नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई, १३ गुन्हे नोंद एकुण ५०,०६८/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

नागपुर ग्रामीण जिल्हयात **दिनांक २६/०६/२०२५** रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन **देशी दारू,मोहाफुल दारू असा एकुण ५०,०६८/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**पोलीस स्टेशन उमरेड येथे आरोपी** रोशन लछ्छीराम राठोड, वय २७ वर्ष, रा. मांडवा याचेवर **पोलीस स्टेशन जलालखेडा** अंतर्गत सतोष शांताराम रेवतकर, वय ४० वर्षे, रा. भिष्णुर, ता. नरखेड आणि महीला आरोपी यांचेवर २ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे दिनेश मंगलाल बावरीया,वय ६५ वर्षे, रा. कळमना ता. जि. नागपुर आणि नारायण झिबल दुधपचरे, वय ६५ वर्षे, रा.मांढळ, ता. कुही जि. नागपुर यांचेवर २ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन भिवापुर आरोपी कं १** अनिल सुरभी सोलंकी, वय ३५ वर्षे, रा. गरडापार, ता. भिवापुर, जि नागपुर, आरोपी कं २. ईसमान बिसन पेंदाम, वय ४९ वर्षे, रा. भोवरी, ता. भिवापुर, जि. नागपुर, आरोपी कं ३ सुभाष गजभिये, वय ३८ वर्षे, रा. भिवापुर, जि नागपुर यांचेवर ३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे तिर्थराज शेकर कडरेल, वय ४३ वर्षे, रा. वार्ड क्र ०३ फेटरी याचेवर, **पोलीस स्टेशन खापा** येथे विनायण श्रीरात नेवारे वय ५२ वर्ष रा.खापा ता.सावनेर आणि महीला आरोपी याचेवर , **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे राजेंद्र केशावराव सुरजुसे, वय ४५ वर्षे, रा.वार्ड क्र ०१, पाटनसावंगी, सावनेर याचेवर तसेच **पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी आयुष

अरुणराव जैस्वाल, वय २६ वर्षे, रा. बेला, वार्ड क्र ४, ता. उमरेड याचेवर अशा **आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १३ गुन्हे दाखल केले आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने